# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

## Maharashtra Industrial Development Corporation

**(A Government of Maharashtra Undertaking)**

मुख्य कार्यालय : "उद्योग सारथी", महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३. प्रिन्सिपल कार्यालय : ४,४ (ऐ) १२ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर-१, कफ परेड, मुंबई ४०० ००५

Head Office : "Udyog Sarathi", Mahakali Caves Road, Andheri (East), Mumbai 400 093.

☎:०२२-४७४८४३१२/४७४८४६७९/९९

Principle Office : 4,4 (A), 12th Floor, World Trade Centre-1, Cuffe Parade, Mumbai-400 005.

☎ : +९१-२२-४०१६१४५१/५४

www.midcindia.org


क्रमांक: मऔविम/भूविभाग/मव्य(भूमी)/P121764 दिनांक: 22/11/23

# परिपत्रक

विषय: भूखंड / शेड / गाळा हस्तांतरणासाठी चटई निर्देशांकावर (FSI) आधारित फरकाची रक्कम आकारणेबाबत.

संदर्भ: (१) परिपत्रक क्रमांक MIDC/DCM/Transfer Guidelines/ ६५१/२६३३, दि १२.०५.१९९८.
(२) परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/कार्यासन-१/३५९१०, दिनांक ०१.०२.२०१३
(३) परिपत्रक क्रमांक मऔविम/मव्य(भूमी)/सी-०५५७९, दिनांक २१.०६.२०१९
(४) परिपत्रक क्रमांक मऔविम/मव्य(भूमी)/डी-८६६५३, दिनांक २७.११.२०१९
(५) परिपत्रक क्रमांक मऔविम/मव्य(भूमी)/डी-२२५४९, दिनांक ०२.०८.२०२१
(६) परिपत्रक क्रमांक मऔविम/मव्य(भूमी)/बी-००१९२, दिनांक १२.०५.२०२३

महामंडळाच्या धोरणानुसार औद्योगिक क्षेत्रातील भूखंड हस्तांतरणासाठी बांधकामावर आधारीत दरातील फरकाची रक्कम आकारुन भूखंडाचे हस्तांतरण करण्यात येते. तथापि, दिनांक २१.०६.२०१९, ०२.०८.२०२१ व १२.०५.२०२३ रोजीच्या परिपत्रकान्वये अनुज्ञेय चटई निर्देशांकाच्या किमान ४० टक्के बांधकाम करणे बंधनकारक करण्यात आले असल्याने त्याअनुषंगाने भूखंड हस्तांतरण प्रकरणात देखील सुधारणा करणे आवश्यक आहे.

महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील भूखंड / शेड / गाळा हस्तांतरणासाठी चटई निर्देशांकावर (FSI) आधारित फरकाची रक्कम आकारणेबाबतचा प्रस्ताव महामंडळाच्या मा. सदस्य मंडळाच्या दिनांक १७.१०.२०२३ रोजी झालेल्या ३९७ व्या बैठकीमध्ये सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर बैठकीमध्ये सविस्तर चर्चा होऊन ठराव क्रमांक ६६१७ पारीत करण्यात आला असुन पुढीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यात आले आहे.

(१) महामंडळामार्फत दिनांक २१.०६.२०१९ पूर्वी वाटप करण्यात आलेल्या आणि अनुज्ञेय चटई निर्देशांकाच्या (FSI) ४० टक्क्यापेक्षा कमी चटई निर्देशांक वापरुन उत्पादनात असलेल्या सर्व प्रकारच्या भूखंड / शेड इत्यादिंच्या अनौपचारिक हस्तांतर प्रकरणी जर प्रवर्गनिहाय मुळ विकास कालावधीमध्ये अनुज्ञेय चटई निर्देशांक (FSI) (Basic) च्या २० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त बांधकाम केले असल्यास अधिमुल्यातील १० टक्के फरकाची रक्कम आकारण्यात यावी आणि जर अनुज्ञेय चटई निर्देशांक (FSI) (Basic) च्या २० टक्के पेक्षा कमी बांधकाम केले असल्यास अधिमुल्यातील ३० टक्के फरकाची रक्कम आकारण्यात यावी.



For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

midcconsultants.in

(२) महामंडळाने दिनांक २१.०६.२०१९ नंतर वाटप केलेल्या तसेच करारनामा कार्यान्वित केलेल्या सर्व प्रकारच्या भूखंड / शेड इत्यादिंच्या अनौपचारिक हस्तांतर प्रकरणी दिनांक १२.०५.२०२३ रोजीच्या परिपत्रकानुसार जर प्रवर्गनिहाय सरसकट वाढीव विकास कालावधीमध्ये अनुज्ञेय चटई निर्देशांक (FSI) (Basic) च्या ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त बांधकाम केले असल्यास अधिमुल्यातील १० टक्के फरकाची रक्कम आकारण्यात यावी आणि जर अनुज्ञेय चटई निर्देशांक (FSI) (Basic) च्या ४० टक्के पेक्षा कमी बांधकाम केले असल्यास अधिमुल्यातील ३० टक्के फरकाची रक्कम आकारण्यात यावी.

उदा. : महामंडळाच्या दिनांक १२.०५.२०२३ रोजीच्या परिपत्रकानुसार "अ" प्रवर्गातील औद्योगिक क्षेत्रामध्ये प्राधान्य सदराखालील / ऑनलाईन थेट वाटप / ई-बिडींग पध्दतीने वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचा मुळ विकास कालावधी व हस्तांतरणानंतर २ वर्षांचा विकास कालावधी देण्यात आलेल्या भूखंडांच्या बाबतीत भूखंडधारकाने २० टक्के बांधकाम करणे अनिवार्य आहे. सदर मुळ विकास कालावधीमध्ये भूखंडधारकाने २० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त बांधकाम पूर्ण करुन भूखंड हस्तांतरणाबाबत विनंती केल्यास अधिमुल्यातील १० टक्के फरकाची रक्कम आकारण्यात यावी. अन्यथा अधिमुल्यातील ३० टक्के फरकाची रक्कम आकारण्यात यावी.

तसेच, सदर भूखंडाचा मुळ विकास कालावधी संपल्यानंतर दिनांक १२.०५.२०२३ रोजीच्या परिपत्रकानुसार उर्वरीत २० टक्के बांधकाम करणेकरिता देण्यात येणा-या पुढील २ वर्षांच्या कालावधीमध्ये भूखंडधारकाने भूखंडावर एकूण ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त बांधकाम पूर्ण करुन भूखंड हस्तांतरणाबाबत विनंती केल्यास अधिमुल्यातील १० टक्के फरकाची रक्कम आकारण्यात यावी. अन्यथा अधिमुल्यातील ३० टक्के फरकाची रक्कम आकारण्यात यावी.

सदरहु परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

22.11.23

(अनिल भंडारी भा.प्र.से.)
सह मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन)
मऔविम, मुंबई

प्रत:

(१) सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
(२) अतिरीक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे / नांदेड / नागपूर
(३) महाव्यवस्थापक (भूमी /विधी/ भूसंपादन/मा व तं/ जनसंपर्क/म.ब.वि./डीएमआयसी/ पणन)
(४) सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम,
(५) सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम,
(६) सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम,
(७) सह / उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई / पुणे / औरंगाबाद / नागपूर.
(८) सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,
(९) सर्व औद्योगिक संघटना
(१०) मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती / मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ / जागतिक व्यापार केंद्र, मुंबई.



For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in
midcconsultants.in